cmyk
• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८० • मंगळवार,दि. ९ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 280 • Tuesday 9 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955


# मराठ्यांनो, लेकरांच्या भविष्यासाठी मुंबईत धडकण्यासाठी सज्ज व्हा -जरांगे पाटील

गेवराई । प्रतिनिधी

मराठा समाजाला जो पर्यंत आरक्षण मिळत नाही तो पर्यंत मी माघारी घेणार नाही.माझ्या माता माऊल्यांना आवाहन करतो तुमचे पोरं मुंबईला निघताना तुमचे आशीर्वाद त्यांच्या पाठीशी राहु द्या.मुंबईला होणारे आंदोलन हे शांततेत करायचे आहे.मराठा आरक्षणासाठी मुंबई येथील आंदोलनात ठामपणे राहु दि.२० जानेवारी २०२३ ला सकाळी ९ वा.अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे प्रस्थान करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मराठ्यांनी या पायी मोर्चात सहभागी व्हायचं आहे. आरक्षण मिळवलं नाहीतर, मराठ्यांच्या मुलांचं प्रचंड हाल होणार आहेत. त्यामुळे कुणीही घरी बसू नये.ही शेवटची लढाई आपल्याला जिंकायची आहे. आरक्षण मिळवल्याशिवाय माघारी यायचं नाही. असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे.




गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे मनोज जरांगे पाटील यांची सोमवार दि.८ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता सभा झाली या सभेसाठी चकलांबा परिसरातील सर्व मराठा समाज बांधवांसह महिला बघिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी मराठा समाज बांधवाकडून ठिकठिकाणी जेसीबी ने फुलांचा वर्षाव करुन स्वागत केले. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी दि.२० जानेवारी रोजी च्या मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषणाची घोषणा केली आहे. यासाठी सराटे अंतरवाली सराटीतून पायी मुंबईकडे प्रस्थान करण्यात येणार आहे. यासाठीचा मार्ग मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे सोमवारी सभेला हजारोंच्या संख्येने मराठा समाज बांधवांची उपस्थिती होती. मनोज जरांगे पाटील यांच्या जन्मभूमी असलेल्या मातोरी शेजारी असणारे चकलांबा व पंचक्रोशीतील समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून मुंबई ला जाण्यासाठी लाखोच्या संख्येने सहभागी होणार आहेत. या निर्णय आंदोलनात आता या निर्णयात आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम साठी लढा दिला जाईल.मराठा समाजातील सर्व लहान थोर युवक महिला विद्यार्थी जनजागृती करत आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या सभेसाठी ▸▸ पान २ वर



# तर हुकूमशाही सत्ताधाऱ्यांना पळून जावे लागेल -ठाकरेंचा हल्लाबोल

मुंबई । वृत्तसंस्था


भजन रामाचे आणि कृती रावणाची असे म्हणत ठाकरे गटाने मुखपत्रातून भाजपवर निशाणा साधला आहे. तपास यंत्रणांच्या कारवाईवरून ठाकरे गटाने भाजपवर टीका केली आहे. या सगळ्यामुळे केंद्रीय तपास यंत्रणांची प्रतिष्ठा धुळीस मिळाली आहे व ईडी-सीबीआयचे महत्त्व कमी झाले आहे, असे ठाकरे गटाने म्हंटले आहे.

''देशासाठी, लोकशाही वाचविण्यासाठी लोक तुरुंगात जायला तयार आहेत. केजरीवाल, सोरेन यांनी निर्भय होऊन हुकूमशाही विरुद्ध लढण्याचे ठरवले आहे. महाराष्ट्रात रोहित पवार यांनी ही काही झाले तरी शरण जाणार नाही असा अस्सल मराठी बाणा दाखवला आहे. ईव्हीएमविरोधात लोक रस्त्यावर उतरले आहेत व 'ईडी' ची डोकी फुटली आहेत . तरीही जनता लढायला तयार आहे. संपूर्ण देशात संतापाचा लाव्हा उसळतो तेव्हा हुकूमशहांना देशातून पळून जावे लागते असे जगाचा इतिहास सांगतो. इतिहासाची पुनरावृत्ती होताना दिसत आहे'', असा हल्लाबोल ठाकरे गटाने केला आहे.



''सत्यवचनी प्रभू श्रीराम मोदी-शहांच्या सरकारला सुबुद्धी देतील असे वाटले होते, पण 'आडात नाही, तर पोहऱ्यात कोठून येणार?' या उक्तीप्रमाणे सध्या या सरकारचा कारभार चालला आहे. भजन रामाचे व कृती रावणाची हेच मोदी-शहा सरकारचे उद्योग सुरू आहेत. विरोधकांना नामोहरम करायचे व त्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणांचा बेछूट गैरवापर करायचा हाच या सरकारचा उद्योग. रावण आणि कंसमामाने त्यांच्या विरोधकांना म्हणजे देव मंडळास बंदी बनवले होते. तरीही शेवटी या दोन्ही राक्षसांचा पराभव झालाच'', असे भाष्यही ठाकरे गटाने केले आहे.

''शेवटी राम-कृष्णाचाच विजय झाला. त्यामुळे कलियुगात ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स, पोलिस बळाचा वापर केला तरी जय सत्याचा होईल. रोहित पवार यांच्या कंपन्यांवर शुक्रवारी ईडीने छापे टाकले. रोहित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे तरुण नेते आहेत व भाजपच्या चोर बाजारात सामील होण्याचे त्यांनी टाळले, दबाव मानला नाही. अलीकडेच त्यांनी एक युवा संघर्ष यात्रा काढली. लोकांचा त्यांना पाठिंबा मिळाला. अजित पवार वगैरे लोकांनी घेतलेल्या डरपोक भूमिकेविरुद्ध ते परखडपणे बोलत आहेत. त्यामुळे 'ईडी'चे संकट त्यांच्यावर कोसळणारच होते. ते शेवटी कोसळलेच'', अशी भूमिका ठाकरे गटाने मांडली आहे. ''राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची याबाबतची प्रतिक्रिया मनोरंजक व राजकीय विश्लेषकांनी अभ्यास करावी अशी आहे.



बीड : तालुक्यातील आहेरवडगाव येथील शिवसेनेचे उपशाखा प्रमुख गोरख थोरात व रांजवण पाटील या परिवारांचा विवाह सोहळा आहेरवडगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास भेट देवून नववधू वरांना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, बीड शिवसेना तालुकाप्रमुख सिंघन यांनी शुभेच्छा दिल्या समवेत शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, पांडुरंग रांजवण,युवा नेते रमेश नवले , सरपंच सुषेन खरसाडे,शाखाप्रमुख राजेंद्र खरसाडे , उपसरपंच अभिमान रांजवण , यांच्यासह परिसरातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वडवणीचा वाघ,शिवसैनिक विनायक मुळे पुन्हा मैदानात

वडवणी । प्रतिनिधी

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या तालुका प्रमुख पदी विनायकबप्पा मुळे यांना पुन्हा मिळाली संधी मिळालेली आहे. काल दै.सामना वर्तमानपत्रामधून बीड जिल्हातील नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या त्यामध्ये विनायक मुळे यांची तालुकाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आलेले आहे. वडवणी शहरांमध्ये व जिल्ह्यामध्ये विनायक बाप्पा मुळे यांचे सत्कार समारंभ मोठ्या प्रमाणात त्यांचे स्नेही कार्यकर्ते करत आहेत व सोशल



मीडियावर ही निष्ठावंत शिवसेनेची नियुक्ती झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे, शुभेच्छा देत आहेत. वडवणी तालुक्यामध्ये परत एकदा निष्ठावंत शिवसेनेचे पुन्हा संधी मिळाल्यामुळे शिवसेनेमध्ये मोठा आनंद उत्सव साजरा ▸▸ पान २ वर

## महाविकास आघाडीतील नेत्यांची जागा वाटपाबाबत लवकरच बैठक

मुंबई । वृत्तसंस्था

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघालं असून जागावाटपावरून महाविकास आघाडीत मोठा पेच निर्माण झाला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबत आता प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीदेखील मविआमध्ये सामील होण्याची शक्यता आहे. मात्र या चारही पक्षांतील विविध नेत्यांकडून जागांच्या वाटपावरून दावे-प्रतिदावे करत एकमेकांवर निशाणा साधण्यात येत ▸▸ पान २ वर




# तलवाडा हद्दीत वाळू चोरी सुसाट! तहसीलदारांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

तलवाडा । प्रतिनिधी

वाळू चोरी हा गेवराई तालुक्यातील महसुल व संबंधित विभाग यांच्यासाठी जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. महिन्याला किमान एक ते दोन कोटी रुपये या अधिकाऱ्यांना अन त्यांच्या बगलबच्यांना मिळत असल्याची तालुक्यात चर्चा आसतांना त्यामुळे वाळूचोरी कडे यातील संबंधित लोकांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे. एका एका पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच ते सहा ठिकाणी रोज किमान प्रमाणात गाड्या सुरू आहेत. जिल्हाधिकारी अन एसपी याकडे लक्ष देतील का हा प्रश्न उपस्थित होत आहे. गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. अधिकृत एकही वाळू पट्टा सुरू नसतांना वाळूचा उपसा मात्र सर्रास सुरू आहे. संपूर्ण गोदावरी काठावर वाळूचा उपसा सुरू असताना कारवाई मात्र होत नसल्याचे चित्र आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोपत पिंपळगाव, पांढरी, बोरगाव थडी गंगावाडी तपे निमगाव येथे केण्या सुरु आसल्यानचे वाळु चोरांच्या या परिसरातील येरझार व सततच्या वास्तव्यावरुन दिसुन येत आहे. या माध्यमातून



रोज किमान ५० ते ६० हायवा, ट्रक आणि ट्रॅक्टर भरून वाळू काढली जाते. मात्र हा प्रकार ना पोलीसांना दिसतो ना तहसीलदारांना दिसतो. रोज नदीपात्रातून वाळू उपसा करायचा अन रात्री वाळू वाहतूक करण्यात येते. एका गाडीचे किमान पन्नास हजार रुपये महिना अन जास्तीत जास्त दोन लाख रुपये महिन्याला गोळा केले जातात. हा रेट तहसीलदार यांचा वेगळा अन पोलिसांचा वेगळा आसल्याची चर्चा आहे. एवढंच नाही तर ज्या भागात वाळू विक्री केली जाणार आहे त्या भागातील महसूल अन पोलीस प्रशासनाचे हप्ते वेगळे आसल्याचे बोलल्या जात आहे. महिन्याकाठी दीड ते दोन कोटी रुपये मिळत असल्याने तहसीलदार आणि पोलिसांनी या वाळू माफियांना गोदापात्र मोकळे करून दिले आसल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा ऐकावयास मिळत आहे. या वाळूमुळे वाळु चोरटे कर्तव्य बजावणा-या ठरावीक पदाधिका-यांच्या जीवावर ऊठल्याचे आणेक उदाहरण आसतांना जिल्हा पोलिस अधीक्षक व जिलाधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष गोदाकाठच्या गाव परिसरात धुरवळा ऊडवत आसल्याने सर्व सामान्यांना खुप मोठ्या दुर्धर आजाराना सामोरे जावे लागत असुन जिल्हा पोलिस मुख्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठजन सामान्य जनाच्या जीवावर ऊठल्याचे बोलल्या जात आहे. शासनाच्या लाखो रुपयाच्या महसूलला चुना लावत अधिकारी मात्र मड्याच्या टाळूवरचे लोणी खाण्यात व्यस्त आहेत. या कडे जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी लक्ष देतील का आसा प्रश्न सर्व सामान्यातुन उपस्थित केला जात आहे.

cmyk

# सर्व मराठ्यांना जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत कुणबी प्रमाणपत्राचा लाभ घेणार नाही -जरांगे पाटील

छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटलांचे राज्यव्यापी आंदोलन सुरू आहे. यासाठी ते गावोगावी भेटीगाठीही देत आहेत. याच काळात कुणबी नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळत आहे. जरांगे यांचाही हाच दावा आहे की, राज्यातील मराठा आणि कुणबी हे एकच आहेत. म्हणूनच मराठ्यांचा ओबीसीमध्ये समावेश करण्यात यावा. त्याप्रमाणे राज्य शासनाच्या समितीकडून राज्यातील कुणबी नोंदींचा धांडोळा घेतला जात होता. याअंतर्गत मराठवाड्यातील बहुतांश गावांमध्ये कुणबी नोंदी सापडल्याही, परंतु खुद्द आंदोलनाचे सूत्रधार मनोज जरांगे यांचीच नोंद सापडत नव्हती. परंतु, काल जरांगे यांची कुणबी असण्याची नोंद शिरूर कासार येथे सापडली आहे. याप्रसंगी त्यांचे वडीलही शिरूर कासार महसूल कार्यालयात हजर होते. याबाबत जरांगे यांची प्रतिक्रियाही माध्यमांनी विचारली आहे.

जरांगे म्हणाले की, आमची कुणबी नोंद मिळणारच होती. जसं सामान्यांचं सापडलं, तसं आमचंही सापडलं होतं. परंतु ती मिळाली असली तरी कुणबी असल्याचा लाभ मी लगेच घेणार नाही. माझे वडील जरी तिथे हजर असले तरी मी लाभ घेणार नाही. कारण जोपर्यंत राज्यातील सर्व मराठ्यांचा ओबीसींमध्ये समावेश केला जात नाही. तोपर्यंत मीसुद्धा कुणबी प्रमाणपत्र स्वीकारणार नसल्याचं जरांगे म्हणाले.



तुमची नोंद सापडली आहे, तुम्हीसुद्धा ओबीसीमध्ये आला आहात यावर तुम्हाला काय वाटतंय? असा सवाल पत्रकारांनी जरांगे यांना केला. यावर ते म्हणाले की, जशी सर्वसामान्यांची नोंद सापडली, तशीच माझीही सापडली आहे. पण नोंद मिळाली असली तरी मी तिचा लाभ घेणार नाही. कारण मी स्वत:साठी हपापलेलो नाही, आमच्या गोरगरीब मराठा लेकरांना त्याचा लाभ मिळावा यासाठी आमचे आंदोलन सुरू आहे. आणि शेवटपर्यंत हा लढा सुरू राहील. माझे वडील तिथे गेले की त्यांना नेलंय याची माहिती घ्यावी लागेल. आणि तीन-चार दिवसांपासून माझ्याच सर्टिफिकेटची का चर्चा केली जात आहे, हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. गोरगरिबांच्या लेकरांच्या आरक्षण मिळावे यासाठी हा लढा आहे. त्यामुळे मी नोंद सापडली असली तरी त्याचा लाभ घेणार नाही, हा माझा निर्धार आहे.

मागच्या आठवड्यातच मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे यांनीआता सरकारसोबतच्या चर्चेला पूर्णविराम देण्याची घोषणा केली. आंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे आणि मुंबईयेथील मराठा आंदोलकांमध्ये बैठक होती. या बैठकीत बोलताना मनोज जरांगे यांच्याकडून याबाबत घोषणा करण्यात आली होती. मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असे जरांगे यांनी म्हटले होते. जरांगे यांच्या या निर्णयामुळे आता सरकारच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण चर्चाच बंद झाली तर मराठा आरक्षणावर तोडगा कसा निघणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जरांगे म्हणाले की, २० जानेवारीला मुंबईकडे निघणार असून तब्बल दोन कोटी मराठे मुंबईत येतील. आता मुंबईतल्या आंदोलकांच्या खांद्यावर समाजाची जबाबदारी आहे. तसेच इथून येणाऱ्या आंदोलकांची जबाबदारी मुंबईच्या आंदोलकांवर असणार आहे. आपल्याला चारही बाजूने घेरले तर आपण दहा बाजूने घेरूयात. मुंबई आंदोलनासाठी दीड लाख स्वयंसेवक तयार करत आहोत. वकिलांची दोनशे जणांची टीम असून दीड हजारावर डॉक्टरांची टीम लागणार आहे. दीड महिन्याचे अन्न सुरुवातीला घेऊन जाणार आहोत. मुंबईला जाताना रस्त्याने पिकांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यायची आहे. तसेच मुंबईकर आणि माझ्यासह यापुढे कोणीही मराठा आंदोलक सरकारशी चर्चा करणार नाही, असेही जरांगे म्हणाले. ज्यांची नोंद मिळाली आहे, त्यांच्या सग्यासोयऱ्यांना सुद्धा लाभ मिळावा अशीआपली मागणी आहे. ज्यांच्यामध्ये नाते जुळतात त्यांना सोयरे म्हणतात. नाते असले तरच ग्रामीण भागात मुलगी देतात किंवा करतात. त्यामुळे ज्यांची नोंद मिळाली त्यांच्या सोयऱ्यांना देखील त्याचा लाभ द्यावा अशी आपण मागणी केली होती. पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की,सरकारला 'सोयरे' हा शब्द आपण दिला नव्हता. त्यांचे न्यायमूर्ती आले होते. सोबत सहा मंत्री होते. या वेळी गायकवाड समितीचे अध्यक्षदेखील आले होते. त्यांनी काही सचिव सोबत आणले होते. त्यांनी आरक्षणावर, घटनेवर अभ्यास करणारे तज्ज्ञदेखील आणले होते. घटनेत आरक्षण बसणार का आणि नाही बसल्यास कोणते शब्द टाकावेत यासाठीदेखील काही लोक आणले होते. ज्यांची नोंद मिळाली त्यांच्या सर्व कुटुंबाला लाभ द्यायचा, नोंद मिळालेल्या व्यक्तीच्या संबंधित नातेवाइकांना लाभ द्यायचा, नोंद मिळालेल्या व्यक्तीच्या सग्यासोयऱ्यांना लाभ मिळणार हे चार शब्द त्यांनीच सांगितले होते, असेही जरांगे म्हणाले.

## संपादकीय

# भारतातील कृषीक्षेत्र अडचणीत

औद्योगिकीकरणाच्या पूर्व स्थितीच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपेक्षा पृथ्वीचे तापमान अधिक वाढणार नाही, असे ध्येय विविध जागतिक परिषदांच्या व्यासपीठांवरून निश्चित केले आहे. निसर्गाच्या आघाडीवर संवेदनशीलता आणि शिस्तबद्धता ही भारताची संस्कृती आहे. जागतिक तापमानावाढीसंदर्भात आपण जगासमोर आपले विचार अधिक सक्षमपणे मांडायला हवेत. पेट्रोलियम पदार्थांच्या तुलनेत कोळशाने कार्बन उत्सर्जन अधिक होत असल्याचे विकसित देश म्हणत आहेत; मात्र जीवाश्म इंधनाचा वापर कमी करायचा असेल तर कोळसा आणि पेट्रोलियम पदार्थ असा भेदाभेद करून चालणार नाही आणि तशी भारताची भूमिका आहे. विकसित देश पेट्रोलियम पदार्थांचा वापर कमी करण्यास तयार नसून, भारतावर मात्र कोळशाचा वापर कमी करण्यासाठी दबाव आणला जात आहे. विकसित देशांच्या या दुटप्पी भूमिकेमुळे हवामान बदलाचे लक्ष्य विचलित राहू शकते. अलीकडेच दुबईत झालेली 'कॉप-२८' परिषद विचारात घेता तापमान नियंत्रण आणि हवामान बदलासंदर्भातील मतैक्य आणि निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी गरजेपेक्षा अधिक काळ लागला; मात्र या परिषदेची फलनिष्पत्ती ही ग्रीन हाऊस गॅस उत्सर्जन कमी करण्यासाठी अधिक ठोस प्रयत्नात होऊ शकते आणि म्हणूनच समाधान व्यक्त होत आहे. तेल लॉबीने आक्रमक युक्तिवाद करूनही २०५० पर्यंत जागतिक तापमानवाढ (ऋश्रेलरश्र थरीाळपस) दीड अंशाच्या आत ठेवण्यासाठी सर्व देशांनी जीवाश्म इंधन, कोळसा आणि तेल तसेच गॅसपासून दूर राहण्यावर एकमत झाले. संयुक्त राष्ट्राच्या यापूर्वीच्या परिषदेतही अशाच घडामोडी झाल्या होत्या. याप्रमाणे हवामान बदल आणि जागतिक तापमान कमी करण्यासाठी काही प्रयत्नही झाले; मात्र विकसित देशांच्या हट्टामुळे आणि जीवनशैलीत बदल न करण्याच्या भूमिकेमुळे हे प्रयत्न अपुरे पडले. औद्योगिकीकरणानंतर ते आजतागायत जगातील २३ समृद्ध देश ऐतिहासिक उत्सर्जनासाठी ५० टक्के जबाबदार आहेत आणि अन्य ५० टक्क्यांत दीडशे देशांचा समावेश आहे. सुमारे दहा वर्षांत तेल आणि गॅसचा वापर हा ८२.३४ टक्के आणि कोळशाचा वापर ४.५६ टक्क्यांनी वाढला आहे. यातही विकसित देशांचे योगदान हे विकसनशील देशांपेक्षा अधिक आहे. अशावेळी हवामान बदल आणि वातावरणातील चढ-उतार यासारख्या समस्यांचा जगाला सामना करावा लागत आहे. समुद्राची पातळी वाढल्याने किनारपट्टीवरील नागरिक अन्य ठिकाणी स्थलांतरित होत आहेत. काही ठिकाणी दुष्काळ, तर काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे. चक्रीवादळामुळे जग अनेक प्रकारच्या संकटांशी मुकाबला करत आहे. कृषी उत्पादनही अडचणीत सापडले आहे. अनेक ठिकाणी तापमान एवढे वाढले की, लोकांचे जगणे मुश्किल झाले आहे. हवामान बदलावर आधारित संयुक्त राष्ट्राच्या परिषदांचा उद्देश मुळातच तापमान नियंत्रणाबाबत आहे. २०५० पर्यंत औद्योगिकीकरणाच्या पूर्व स्थितीच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपेक्षा पृथ्वीचे तापमान अधिक वाढणार नाही, असे ध्येय निश्चित केले आहे. विकसित देशांनी हवामान बदलामुळे निर्माण होणार्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी दरवर्षी १०० अब्ज डॉलर मदत करण्याचे आश्वासन दिले; मात्र ही मदत समस्येचे अक्राळविक्राळ रूप पाहता पुरेशी ठरणारी नाही. जीवाश्म इंधनाच्या वापरात हळूहळू घट केली जाईल आणि ती थांबविण्यात येईल, यावर एकमत झाले. संमेलनात अनेक वचने घेण्यात आली. यात शाश्वत ऊर्जेत तीन टक्के वाढ करणे, तापमान कमी करण्यासाठीच्या उपक्रमांत कार्यकुशलता वाढविणे आदींचा समावेश आहे. गेल्या संमेलनात जीवाश्म इंधनातील कोळसा किंवा पेट्रोलियम पदार्थ यांपैकी कशाचा वापर कमी करावा, यावर चर्चा झाली. विकसित देशांनी पेट्रोलियम पदार्थांचा वापर कमी करणार नसल्याचे सांगितले; परंतु कोळशाचा अधिक वापर असलेल्या भारतासारख्या देशावर दबाव आणून तो बंद करण्याची मागणी करत आहेत. एवढेच नाही, तर परिषदेच्या अंतिम मसुद्यात विकसित देशांचा हस्तक्षेप राहिला.

# माजी पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत होणार प्रवेश -सचिन मुळूक

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्हा शिवसेनेतील ठाकरे गटात पदाधिकाऱ्यांनी सुषमा अंधारे यांच्याविरोधात बंड पुकारले होते. मागील महिन्यात प्रसार माध्यमांसमोर राजीनामे देत उध्दव ठाकरे जवळ आपली नाराजी व्यक्त केली होती. बीड जिल्ह्यात सुषमा अंधारे याना डोईजड वाटणाऱ्या पदाधिकाऱ्यांना काल पक्षातून काढण्यात आले. वर्षानुवर्षे निष्ठेने कार्य करणाऱ्या शिवसैनिकांची हकालपट्टी केली ही बाब शिवसैनिकांना काही रूचली नाही. सुषमा अंधारे यांच्या मनमानी कारभाराला वैतागलेल्या शिवसैनिकांची विचारपूस करण्याचे कष्ट ठाकरे ना घ्यावे वाटले नाही. हकालपट्टी संदर्भात उध्दव ठाकरेंविषयी बीड जिल्हातील शिवसैनिकांच्या मनामध्ये आक्रोश पाहायला मिळत आहे. अंधारे यांच्या मनमानीला कंटाळून परळी, अंबाजोगाई, माजलगाव, वडवणी तालुक्यातील उ.बा.ठा.चे ५३ पदाधिकारी व शेकडो शिवसैनिक, ग्रामपंचायत सदस्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करण्याचे निश्चित केले आहे. ठाकरे गटातील नाराज शिवसैनिकांनी परळी येथे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद घेतली. परळीचे दुसऱ्या पिढीचे शिवसैनिक तालुका प्रमुख तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे, अंबाजोगाई शहर प्रमुख गजानन मुडेगावकर, वडवणीचे तालुका समन्वय माऊली गोंडे यांनी ठाकरे यांना आपल्यावर केलेल्या अन्यायाला वाचा फोडली. उद्धव ठाकरे यांना शत्रूंची आवश्यकता नाही, सुषमा अंधारे उध्दव ठाकरे यांना संपवायला एकट्या पुरेशा आहेत, अशी भावना प्रसार माध्यमांसमोर व्यक्त केली. परळी तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांचा १२ जानेवारीला वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत खऱ्या शिवसेनेत प्रवेश घेणार असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. यावेळी जिल्हा संघटक योगेश नवले, माजलगाव उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, अंबाजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे, नारायण कुरुंद, शिवसेना शहरप्रमुख वैजनाथ माने, गजानन मुदेगावकर, राजा पांडे, माऊली गोंडे उपस्थित होते. उ.बा.ठा. गटाने सामनातून आजच नियुक्त करण्यात आलेले परळी विधानसभा प्रमुख राजा पांडे, केज विधानसभा समन्वयक दत्ता बोडखे या दोन पदाधिकाऱ्यांनी बारा तासाच्या आत परळी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आम्ही आपल्या पदाचा राजीनामा देत आहोत, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जाहीरपणे सांगितले.

# विद्यार्थ्यांना परिक्षेत पास करण्यासाठी पैसे घेणाऱ्यांवर कारवाई कधी करणार?

मुंबई । वृत्तसंस्था

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करत पास होण्यासाठी पैसे मागितले जात असल्याचा प्रकार नुकताच उघड केला. अकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीतही चुका झाल्याचे स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे तरीही अद्याप संबंधित दोषींवर गुन्हा दाखल केलेला नाही. इंजिनिअरिंग व फार्मसीसारख्या विभागात असा सावळा गोंधळ होत असेल तर कोणतीही कंपनी महाराष्ट्रातील इंजिनिअर व फार्मसिस्टना नोकरीवर घेणार नाही हे अत्यंत गंभीर आहे, या प्रकरणी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अन्यथा काँग्रेस आपल्या मार्गाने प्रश्न सोडवेल असा इशारा प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते लोंढे यांनी दिला आहे. यासंदर्भात पत्रकारांशी संवाद साधताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, इंजिनिअरिंगचे पेपर ऑनलाईन तपासले जातात व ऑनलाईन नापास केले जाते. या नापास विद्यार्थ्यांना पास करण्यासाठी पैसे द्या असे मेसेज टेलिग्रामवरून पाठवले जातात. अकॅडमिक कौंसिलच्या बैठकीत अशा प्रकारच्या चुका झाल्याचे स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे पण कारवाई मात्र केलेली नाही. फेरतपासणीचे निकाल लागले नसतानाच दुसरी परिक्षा घेण्यात आली. फेरतपासणीत हे विद्यार्थी पास झाले तर काय करणार ? तुम्ही पास होणार नाही असे विद्यार्थ्यांना सांगितले जाते, म्हणजे विद्यार्थ्यांना ठरवून नापास करता का? आणि फेरतपासणीचा निकाल न लावता परीक्षा कशी घेतली ? या विद्यापीठातील जवळपास ११ हजार विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे, एवढ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करण्याचा अधिकार यांना कोणी दिला? संबंधित लोकांवर गुन्हा दाखल का केला नाही? कोणाला वाचवण्याचा हा प्रयत्न आहे. ऑनलाईन पेपर तपासणाऱ्या खाजगी कंपनीला ब्लॅकलिस्टमध्ये का टाकले नाही? विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळऱ्यांवर काय कारवाई केली? ऋखठ का दाखल केला नाही? याची उत्तरे मिळाली पाहिजेत. राज्यपाल महोदय हे कुलपती आहेत, त्यांच्याकडे याप्रश्नी वेळ मागितला आहे, ते विद्यार्थ्यांना न्याय देतील अशी अपेक्षा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालवल्या जाणाऱ्या विद्यापीठात असे प्रकार होत आहेत हे अतिशय गंभीर आहेत.

# शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालय येथे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून आज दिनांक ०८/०१/२०२४ रोजी बीड जिल्ह्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची मुखपत्र सामना मधुन निवडी जाहीर करण्यात आल्या यामध्ये केज व परळी विधानसभेतील पदाधिकार्यांच्या निवडी शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी नियुक्त्या जाहीर झाल्या यामध्ये नवनियुक्ती पदाधिकार्यांच्या सत्कार जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या हस्ते केज येथील जिल्हा संपर्क कार्यालय येथे संपन्न झाला.



## पान ४ वरून...

### अखेर जरांगे पाटलांच्या

आले. शिरुर कासार तालुक्यातून तहसील कार्यालयात अन्य दस्ताऐवजानुसार १ हजार नोंदीचे प्रस्ताव आले आहेत. अद्याप कुणालाही तहसील कार्यालयाकडून प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

### लेकीच्या जन्माचे

गावात वाजतगाजत लेझीमच्या पथकासह, सर्व गावातील महिलांनी औक्षण करून व फुलांचा वर्षाव करत, फटाके, फोडून लेकीच्या जन्माचा आनंद व्यक्त करण्यात आला. मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी शिक्षिका नागरगोजे यांच्या प्रयत्नांना खामगावकरांनी कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. या कार्यक्रमात आपला परिवार वृद्धाश्रमाच्या संचालिका मनीषा पवार यांचा सन्मान करून त्यांना धान्य व रोख रक्कम देण्यात आली. गावात मिरवणूक काढून ठिकठिकाणी मुलीचं औक्षण करण्यात आले. प्रत्येक घरासमोर रांगोळी काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान फुलांचा वर्षाव करण्यात आला. मुलीच्या आई-वडिलांना झाडांची भेट देऊन त्यांचे संगोपन करण्यासाठी विनंती केली. ज्या मुलांचे छत्र हरवले आहे, त्या मुलांनाही ड्रेस, पुस्तक देऊन गौरविण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप करण्यात आले

### मोटारसायकलला

देवळा येथून आपल्या गावाकडे निघाली असता पाठिमागून अक्षय जाधव हा आला व त्याने मुलीस मोटारसायकलची धडक देऊन तिला जखमी केले. या प्रकरणी मुलीच्या फिर्यादीवरून आरोपी अक्षय जाधव याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पान १ वरून....

### वडवणीचा वाघ, शिवसैनिक

केला जात आहे. त्यांच्या या निवडीने निष्ठावंत शिवसैनिकाला न्याय मिळाल्याची भावना शिवसैनिक व्यक्त करू लागले आहेत. विनायक मुळे यांच्याकडे यापूर्वी वडवणी तालुका प्रमुख पदाची जबाबदारी होती. मध्यंतरी बीड जिल्ह्यात शिवसेनेमध्ये नवीन चेहऱ्यांना संधी दिल्यानंतर विनायक मुळे यांना पदावरून दूर करण्यात आलेले होते. कुठलेही पद नसतानाही विनायक मुळे हे सर्वसामान्य नागरिक व्यापारी यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी त्यांना न्याय देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत होते. मागील कालखंडामध्ये शिवसेनेमध्ये अनेक घडामोडी घडल्यानंतरही विनायक मुळे हे मातोश्रीवर असलेली आपली एकनिष्ठा कायम ठेवली. त्यांना अनेक ऑफर येत गेल्या त्यांनी फक्त आणि फक्त उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ राहिले. विनायक मुळे मोठा संघर्ष करून सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ जपत त्यांच्या प्रश्नावर आंदोलनाच्या माध्यमातून सतत आवाज उठवत राहिले. विनायक मुळे यांच्यासह वडवणी येथील युवराज शिंदे यांच्याकडे जिल्हा सहसचिव पद देण्यात आले आहे. शहर प्रमुख शिवाजी दुटाळ, वडवणी तालुका समन्वय सचिन धपाटे, शहर समन्वयक अशोक चाटे, उप तालुकाप्रमुख अशोक गोंडे, आकाश सावंत, श्रीराम झाटे, तालुका संघटक महादेव सातपुते यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.

### मराठ्यांनो लेकरांच्या

चकलांबा आणि चकलांबा परिसरातील मुस्लिम बांधवांनी मराठा बांधवांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.तसेच, मुस्लिम बांधवाकडून मनोज जरांगे पाटील यांचा जंगी सत्कार करण्यात आला. तसेच मनोज जरांगे पाटलांना मुस्लिम समाजाकडून जाहीर पाठिंबा देण्यात आला.

### महाविकास आघाडीतील

आहे. मित्रपक्षातील नेतेच टीकास्त्र सोडू लागल्याने मविआच्या कार्यकर्त्यांमध्येही गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे. या पार्श्वभूमीवर जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी आता नवी दिल्ली येथे महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक होणार असल्याची माहिती समोर आली आहे. जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे या नेत्यांची बैठक होणार आहे. दिल्लीत १४ किंवा १५ तारखेला होणाऱ्या या हाय व्होल्टेज बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जागावाटपावर एकमत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जो पक्ष ज्या ठिकाणी मजबूत असेल ती जागा सदर पक्षाला दिली जावी, या सूत्राच्या आधारे मविआचे हे नेते जागावाटपावर तोडगा काढणार असल्याचे समजते. जागावाटपाचा तिढा जितक्या लवकरात लवकर सुटेल तितका फायदा मविआला निवडणुकीत होईल, असं या सर्वच नेत्यांचं म्हणणं असल्याने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा असून आतापर्यंत मविआचे विविध संभाव्य फॉर्म्युले समोर आले आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आगामी निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला १८ ते १९ जागा, काँग्रेसला १३ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला १० जागा, वंचित आघाडीला २ जागा, स्वाभिमानी शेतकरी पक्ष २ जागा आणि बहुजन विकास आघाडी १ जागा देण्यावर एकमत होऊ शकतं. मात्र अजून चार जागांवर असलेल्या चर्चा अंतिम टप्प्यात असून लवकरच मविआचे अंतिम जागावाटप जाहीर करण्यात येईल अशी माहिती सूत्रांनी दिली. मुंबईतून सहा लोकसभा जागांपैकी दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई आणि उत्तर पश्चिम मुंबई या तीन जागा शिवसेना उबाठा लढवण्याची शक्यता असून उत्तर मध्य मुंबई आणि उत्तर मुंबई या दोन जागा काँग्रेस लढणार असून उत्तर पूर्व मुंबईची जागा राष्ट्रवादीला सोडण्यात येण्याची शक्यता आहे. तर रायगड, संभाजी नगर या दोन जागा ठाकरेंच्या शिवसेनेला सोडण्यात आल्याची माहिती आहे. काँगसच्या १३ जागांमध्ये उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, भिवंडी, पुणे, सोलापूर, लातूर, नांदेड, धुळे, नंदुरबार, नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली, तर वंचितसाठी अकोला, शिर्डी आणि राजू शेट्टी यांना कोल्हापूर, हातकणंगले, तर बहुजन विकास आघाडी सामील झाल्यास त्यांना पालघरची जागा सोडण्यात येण्याची शक्यता आहे.


## जाहिर प्रगटन

**मा.आर.डी.गवई, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश,व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात,बीड,ता.जि.बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०८३/२०२३**
CNR No. MHBI020047612023

अर्जदार : १) कृष्णाबाई भ्र. अभिमान काळे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. महिंद्रा कंपनीच्यासमोर, गांधीनगर, पिंपरी पुणे, ता.जि. पुणे, ह.मु. तांदळवाडी घाट, ता.जि.बीड,२) सुभाष पि. अभिमान काळे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ३) सचिन पि. अभिमान काळे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा.सदर, ४) सुनिता भ्र. बबन पवळे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेहरूनगर रोड, हनुमान मंदिरासमोर, गांधीनगर, पिंपरी पुणे, ता.जि.पुणे, ५) शीतल भ्र. अमोल क्षीरसागर, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, हनुमान मंदिरासमोर गांधीनगर,पिंपरी पुणे, ता.जि.पुणे

विरूध्द निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्युेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणेबाबत.

वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत **अभिमान पि. नारायण काळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमापत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **अभिमान पि. नारायण काळे** यांचा दिनांक २०/०२/२०२२ रोजी **तांदुळवाडी घाट, ता.जि.बीड** येथे मृत्यू झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क्रमांक ४ व ५ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत **अभिमान पि. नारायण काळे** यांचे मृत्यूनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत अस कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारसा हक्क प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख १३/०२/२०२४**

**आज दिनांक २६ माहे डिसेंबर २०२३ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

क.लिपीक

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक

मार्फत
अ‍ॅड.शेळके वाय.आर. दिवाणी न्यायालय,व.स्तर,बीड.


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com



# माझ्यासोबत न डगमगणारे शिवसैनिक-ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था**

बाहेर भटकंतीला गेलेल्या, खोक्यात बंद झालेल्यांना पुन्हा घरात घेणार नाही, असा आसूड माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर ओढला आहे. उल्हासनगर येथील राजेश वानखेडे यांनी आज शेकडो सहकाऱ्यांसह ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत 'मातोश्री' निवासस्थानी शिवबंधन बांधून पक्षात प्रवेश केला. यावेळी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी शिंदेंचा समाचार घेतला. दरम्यान राजेश वानखेडे यांनी शिवसेनेत प्रवेश करताच आज आपल्या घरात आल्यासारखेवाटतं अशा शब्दात भावना व्यक्त केल्या. याचाच उल्लेख करत उद्धव ठाकरे म्हणाले की, तुम्ही फार महत्त्वाच्या शब्दांमध्ये भावना मांडल्या. पण काही जण बाहेर भटकंतीला गेले आहेत. त्यांना परत घरात घेणार नाही. कारण जे खोक्यात बंद झालेत त्यांना पुन्हा खोक्यातून बाहेर काढण्याची गरज नाही. यानंतर उपस्थित शिवसैनिकांनी '५० खोके, एकदम ओके' अशी घोषणाबाजी केली. यावेळी राजेश वानखेडे यांचे पक्षात स्वागत करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवसेनेसारखे प्रेम दुसऱ्या कोणत्याही पक्षात मिळत नाही. म्हणून तुम्ही आज परत घरात आल्यासारखे वाटत आहे, असे बोललात. हेच आपल्या शिवसैनिकांचे वैशिष्ट्य आहे. अमिताभ बच्चन आणि शशी कपूर यांचा एक डायलॉग आहे. आज मेरे पास ये है, आज मेरे पास वो है तुम्हारे पास क्या है? तर आपल्याकडे शिवसैनिकांची माया, प्रेम आणि जिद्द आहे. सगळ्या गोष्टी पैशाने विकत घेता येतात, पण आपुलकी, माया, प्रेम, जिद्द, हिंमत ही कुठेही विकली जाऊ शकत नाही आणि विकत घेता येत नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे म्हणाले की, ही लढाई फार मोठी आहे, पण तुमच्यासारखे सगळे कट्टर एकवटले तर लढाई फार सोपी आहे. कारण जिद्दीने माणूस उभा राहिला तर त्याच्यासमोर कितीही पहाडासारखी संकटं आली तरी तो डगमगत नाही. तशी न डगमगणारे शिवसैनिक माझ्यासोबत आहेत. आज आपल्यासमोर सगळे खोकेवाले, खोके घेणारे आणि देणारे आहेत. त्यांनी पक्ष, चिन्ह सगळे घेतले तरी उठता, बसता, स्वप्नात घटनाबाह्य सरकारला उद्धव ठाकरे दिसतात. कारण उद्धव ठाकरे एकटा नसून माझ्यासोबत महाराष्ट्र आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# मराठी पाट्यांसाठी संभाजीनगर महापालिकेचा दुकानदारांना अल्टिमेटम

## संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्रीकांत यांच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

शहरातील सर्व दुकानांची व कार्यालयांची नाव फलक किंवा साइनबोर्ड मराठी भाषेत लावावेत, यासाठी महापालिकेने १५ दिवसांची मुदत दिली आहे. तसे आदेश छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी दिले. मनपा प्रशासकांनी रविवारी शहरातील काही भागात पाहणी करत दुकानाचे, प्रतिष्ठानचे नाव राज्य शासनाच्या आदेशानुसार मराठी भाषेत लिहिण्याचे निर्देश दिले. याशिवाय मोठ्या अक्षरात नावे लिहावे, असेही सांगितले. तसेच, मराठी भाषेत साइनबोर्ड लावण्यासाठी त्यांनी १५ दिवसांची मुदत दिली. ही मुदत संपल्यावर सुद्धा दुकानदारांनी दुकानांचे साइनबोर्ड मराठीत नाही लावले, तर दुकानं आणि प्रतिष्ठानांना सील करण्यात येईल असा इशारा देण्यात आलाय. शहरातील प्रोझोन मॉलसह शहरातील सर्व दुकाने व प्रतिष्ठान यांनी दुकानाचे नावफलक किंवा साइनबोर्ड मराठी भाषेत पण लावावे, असे आदेश आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी दिले आहेत. मनपा प्रशासकांनी रविवारी प्रोझोन मॉलला भेट दिली. मॉलमधील सर्व शोरूम मालकांना त्यांच्या दुकानाचे, प्रतिष्ठानचे नाव राज्य शासनाचा आदेशानुसार मराठी भाषेत लिहिण्याचे निर्देश दिले. याशिवाय ज्या शोरूम्सचे नाव मराठी भाषेत बारीक अक्षरात लिहले आहे त्यांनी मोठ्या अक्षरात नावे लिहावे, असे निर्देश यावेळी प्रशासकांनी दिले. तसेच मराठी भाषेत साइनबोर्ड लावण्यासाठी त्यांनी १५ दिवसाची मुदत दिली. ही मुदत संपल्यावर पण प्रोझोन मॉल आणि शहरातील इतर सर्व दुकानदारांनी त्यांच्या दुकानांचे साइनबोर्ड मराठी भाषेत नाही लावले तर अशा दुकानी आणि प्रतिष्ठानांना सील करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक दुकानावर असेलल नाव मराठीतच असले पाहिजे अशी भूमिका मनसेकडून सतत करण्यात येत आहे. यासाठी अनेकदा मनसेकडून आंदोलन देखील करण्यात येते. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देखील मनसे याच मुद्यावरून आक्रमक झाल्याचे काही दिवसांपूर्वी पाहायला मिळाले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे स्टाईल आंदोलन करण्यात आले होते. यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील हडको कॉर्नर येथील इंग्रजी भाषेत लावलेल्या पाट्यांची तोडफोड केली होती. याचवेळी जावीद हबीब या सलूनच्या मुख्य बोर्डची तोडफोड करण्यात आली होती. त्यानंतर आता महानगरपालिकेने देखील मराठ्या पाट्यांसाठी शहरातील दुकानदारांना १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

# लोकशाही बळकट करण्याचे काम पत्रकार करतात

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील व विशेषतः बीड जिल्ह्यातील पत्रकारिता ही लोकशाही बळकट करण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन आय पी एस बी धीरजकुमार यांनी आज राजस्थानी मंगल कार्यालय माजलगाव येथे सन्मानुचौथ्यास्तंभाचा दर्पण दिनानिमित्त सर्व पत्रकारांचा सन्मान हा कार्यक्रम शहर पोलीस स्टेशन व माहेश्वरी सभा माजलगाव यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात केले. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी माजी आमदार आदरणीय राधाकृष्ण अण्णा होके पाटील, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे, कविवर्य प्रभाकर साळेगावकर सर, अनंतशास्त्री जोशी, रवींद्रजी कानडे, निखिल वाघमारे सर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ साहेब यांनी केले व्यासपीठावरील मान्यवरासहित पत्रकार उमेशकाका मोगरेकर, अमरनाथजी खुरपे यांचे विचार व मार्गदर्शन अतिशय सुंदर व उत्कृष्ट झाले. आज ऐकण्यासाठी अतिशय खूप छान एक श्रोता म्हणून सुंदर पर्वणीच माजलगाव कराना मिळाली.होती. हा एक स्तंभाने दुसऱ्या स्तंभाचा एक सन्मान ठेवला होता माजलगाव मध्ये ही पहिलीच वेळ आहे की पोलीस प्रशासन व माहेश्वरी सभा यांनी इतका सुंदर आणि सर्वांना मोहित करणारा कार्यक्रम आयोजित केला होता कार्यक्रम तीन घंटे चालला पण वेळ कसा गेला हे कळालेच नाही शक्यतो एवढा वेळ लागल्यावर कार्यक्रमातील लोकांची संख्या हळूहळू कमी होते पण या कार्यक्रमाची संख्या हळूहळू शेवटपर्यंत वाढत राहिली सर्वांच्या भाषणात वेगवेगळे दाखले वेगवेगळ्या गोष्टी आणि ऐकण्यासाठी वेगवेगळे विचार आज मिळाले आलेल्या आम्हा सर्वांचा सत्कारही आयोजकाने केला पोलीस प्रशासन व माहेश्वरी समाज यांनी असा सार्वजनिक कार्यक्रम प्रथमच घेतला पण मनापासून सांगतो सर्वांचे मार्गदर्शन विचार दर्पण दिनानिमित्त पत्रकारांच्या भूमिका पोलीस प्रशासनाची भूमिका सर्वांनी त्यांच्या त्यांच्या शैलीतून वेगवेगळ्या पद्धतीने मांडली या कार्यक्रमाला मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकआबा डक, माजलगाव मार्केट कमिटी सभापती जयदत्तजी नरवडे, माजी नगराध्यक्ष शेख मंजूरभाई, दयानंदभाऊ स्वामी, डॉ प्रशांत पाटील, श्रीहरीनाना मोरे, विनायक रत्नपारखी, सुरेंद्र रेदासणी मनोहरराव डाके यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, डॉक्टर, वकील तसेच सर्व व्यापारी बांधव, मैत्री ग्रुप, सर्व पत्रकार बांधव, नागरिक सर्व स्तरातील लोक उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शितलकुमार बल्लाळ साहेब त्यांचे सहकारी शहर पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार, माहेश्वरी सभेचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया व त्यांचे सहकारी यांनी मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाडेकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन पत्रकार उमेश जेथलिया आहे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी अतिशय स्वादिष्ट अशा सुंदर दाळ भाटी भोजनाचा लाभ घेतला.

# मराठी कलाकारांनो, एकमेकांना मान द्या ठाकरे


**पुणे । वृत्तसंस्था**

मी जेव्हा इतर भाषेतील कलाकारांना भेटतो तेव्हा ते एकमेकांना खूप आदराने हाक मारतात. मात्र, मराठी कलाकार एकमेकांसोबत त्या अदबीने वागताना दिसत नाहीत. तुम्ही जर एकमेकांना मान नाही दिला तर प्रेक्षक तुमचा मान कसा राखतील? त्यामुळे एकमेकांना मान द्या अन् दुसऱ्याचा मान ठेवा, असा सल्ला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रविवारी मराठी कलाकारांना दिला. शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात आज राज ठाकरे यांची नाटक आणि मी' या विषयावर मुलाखत झाली. या वेळी ते बोलत होते. अभिनेते दीपक करंजीकर यांनी ठाकरे यांच्याशी संवाद साधला. या वेळी १०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल उपस्थित होते. राज ठाकरे म्हणाले, पूर्वीच्या काळी मराठी चित्रपट व नाट्यसृष्टीत अनेक सुपरस्टार होते. मात्र, आता केवळ कलाकार राहिलेले आहेत. मराठी कलाकार एकमेकांशी बोलताना टोपणनावाने हाक मारतात, हे चुकीचे आहे. जे नाटके करतात; त्यांना लोक घरी बसवतातच: महाराष्ट्राने २०१९ मध्ये 'कट्यार पाठीत घुसली'चा प्रयोग पाहिला. मात्र, २०२२ मध्ये आता होते, गेले कुठे, अशी त्यांची अवस्था झाली. जे नाटके करतात; त्यांना लोक घरी बसवतातच, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर रविवारी नाट्य संमेलनात निशाणा साधला. फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर सभागृहात हशा पिकला. मराठी कलाकार आद्या, पद्या, शेळ्या, मेंढ्या अशा हाका मारत राहिले, पुष्प्या आला, आंड्या आलाय, असं तुम्ही भर मंचावर आणि शेकडो लोकांसमोर बोलता, ही सर्वात मोठी चूक आहे.

# महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळाची कडक भूमिका

**नागपूर । वृत्तसंस्था**

राज्यातील शिक्षणसंस्था चालकांचे प्रश्न दहा वर्षांपासून प्रलंबित आहे. मात्र त्याकडे सरकारचे कमालीचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप महाराष्ट्र शिक्षणसंस्था महामंडळाचे कार्यवाह रवींद्र फडणवीस यांनी केला. येत्या फेब्रुवारीत होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी इमारती व कर्मचारी देणार नसल्याचा इशारा फडणवीस यांनी दिला आहे. सरकार आमच्या मागण्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. सरकारला अनुदानीत शिक्षणसंस्थांचे कंबरडे मोडायचे आहे. शालेय आणि उच्चशिक्षातून



आपला हात बाहेर काढायचा आहे. राईट टु एज्युकेशन' बरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचाही अधिकार मुलांना आहे. परंतु त्याकडे शासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. त्यासाठी लागणारी आर्थिक मदत वारंवार सांगूनही उपलब्ध करून देत नाहीत. बारा वर्षांपासून ७० हजार शिक्षकांच्या जागा रिक्त आहे. अतिरिक्त शिक्षकांचा मोठा प्रश्न अजूनही सुटलेला नाही असे फडणवीस यांनी सांगितले. शिक्षणमंत्री शिक्षक भरतीच्या रोज नव्या तारख्या जाहीर करतात. पण अजूनही प्रक्रिया सुरू झालेली नाही. वेतनेतर अनुदान अजून दिलेले नाही. अडिच हजार कोटींचे वेतनेतर अनुदान देय असतानाही २६८ कोटींच्यावर देण्यास तयार नाहीत. एक बैठक शालेय शिक्षणमंत्र्यांसोबत झाली होती. पण त्यातून तोडगा निघाला नाही. सध्या न्यायालयात दाद मागितली आहे. मुख्यमंत्र्यांनाही पत्र दिलेले आहे. सरकारचा नकारात्मक दृष्टीकोन आहे असे आरोप फडणवीस यांनी केले. सरकार आम्ही चोर आहोत असे वागतात. सरकारने जबरदस्तीने इमारती अधिगृहीत करण्याचा प्रयत्न केला तर न्यायालयीन लढा देऊ .

# माजलगावच्या गावखेड्यात ५ दिवसापासून बिबट्याचा थरार

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्याच्या तब्बल ६ गावखेड्यात गेल्या पाच दिवसापासून बिबट्याने धुमाकूळ माजवला आहे.दरम्यान बिबट्याचा गावागावात थरार निर्माण झाला आहे.सोमचार दि.८ जानेवारी रोजी पहाटे रामपिंपळगावात बिबट्याने २० बकऱ्याच्या पिल्ल्यांसह मोठ्या बकऱ्या फस्त केल्या आहेत. वनविभागच्या अधिका-यांनी घटनास्थळी सकाळीच धाव घेत परिसरात बिबट्याची सरचिंग सुरू केली आहे. दरम्यान बिबट्याच्या अस्तित्वाने दहशत पसरली आहे. वन विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तालुक्यातील मंगरूळ नं.१, हरकीलिमगावर,मंगरूळ नं. २, राम पिंपळगाव, सावरगाव, खेर्डा, यासह ईतर गावाच्या शिबात बिबट्या आढळून आला आहे, असा दावा स्थानिक गावातील नागरिक गेल्या ५ दिवसापासून करत होते. मंगरुळ येथे शेतातील वगारु (म्हैस) वरही हल्ला केला होता. परंतु बनविभागाने याची काळजी घ्यावी तशी घेतली नाही, वनविभागाच्या या निष्काळजीपणाचा फटका सोमवार दि.८ जानेवारी रोजी रामपिंपळगाव येथे बसला. बिबट्याने याठिकाणी बकऱ्यावर हल्ला केला. या हल्ल्यात २० बकऱ्या मरण पावल्या आहेत. त्यामुळे सर्वगावात बिबट्याचा थरार निर्माण झाले आहे.या घटनेनंतर गावागावात दहशत पसरली आहे. रात्रीच्या वेळेस लाईट असल्यामुळे शेतात पाणी देण्यासाठी जावे की नाही असे प्रश्न निर्माण झाला आहे.लहान मुले घाबरून गेले आहेत.शाळेत जाण्यासाठी किंवा खेळण्साठी ही ते घराबाहेर पडत नसल्याचे बित्र आहे. दरम्यान गेल्या पाच दिवसात बिबट्या तब्बल ८ ते १० लोकांना वेगवेगळ्या ठिकाणी दिसला आहे असा दावा स्थानिक लोकांकडून होत होता,या घटनेनंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यानी सकाळीच घटनास्थळी धाव घेतली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी, कर्मचारी, चित्ते, पाईक,ममुले, केंद्रे,डी.एस. मोरे बनपाल वडवणी,आर.सी. देवकांबळे,पारखे वाहनचालक सिद्धेश्वर चव्हाण यांनी परिसरात बिबट्याची शोध मोहीम सुरू केली आहे. संध्याकाळी एकटे घराबाहेर पडू नये. उगडया जागेवर शौच्छालयासाठी जाऊ नये खाली बसल्या नंतर तो हल्ला करतो, जास्त तर एकट्या खाली बसलेल्या व्यक्तीवर करतो. लहान बालकांना घरा बाहेर संध्याकाळी व शौच्छालयासाठी घरा बाहेर पडू देऊ नये. शेतात असलेल्या जनावरांना बंदीस्त गोठा बनवावा जेणे करून त्यांचा हल्ल्यापासून बचाव होईल शेतकऱ्यांनी शेतात जाताना गळ्याला मफलर, टॉवेल, जाड रुमाल गुंडाळून जावे, कारण बिबट्या जास्त प्रमाणात मान व गळ्यावर हल्ला करतो.

# गुटख्याच्या दोन गाड्या पकडल्या

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी ते तेलगाव मार्गे दोन गाड्यात गुटखा जात असल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस अधिक्षक धिरजकुमार यांना झाल्यानंतर त्यांच्या पथकाने सापळा रचून या दोन्ही गाड्या पकडल्या. या दोन्ही गाड्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला. या गुटख्याची किंमत १७ लाख ७२ हजार इतकी आहे. एका गाडीच्या चालकास पोलिसांनी अटक केली तर दुसर्या गाडीचा चालक फरार झाला आहे.

वडवणी ते तेलगाव मार्गाने दोन गाड्यात गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधिक्षक धिरजकुमार यांना झाल्यानंतर त्यांच्या पथकातील कर्मचार्यांनी तेलगाव रोडवरील गजानन जिनिंगसमोर सापळा रचला. यामध्ये स्विफ्ट डिझायर गाडी क्र. (एम.एच. ४४ ०४४०) ही गाडी ताब्यात घेण्यात आली असून त्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आढळून आला. स्विफ्ट गाडी पकडल्याचे पाठिमागील गाडीच्या चालकास निदर्शनास आल्यानंतर महिंद्रा गाडीच्या चालकाने गाडी घटनास्थळी सोडून पळ काढला. दुसर्या गाडीचा नंबर एम.एच. १७ ए.जे. २२१७ एक्स यु व्ही. यातही गुटख्याच्या गोण्या आढळून आल्या. या दोन्ही गाड्यांमध्ये १७ लाख ७२ हजार रुपयांचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी स्विफ्ट गाडीचा चालक शेख राजू (रा. सिरसाळा) याला ताब्यात घेतले तर महिंद्रा गाडीचा चालक शेख आसिप (रा. पात्रूड) हा मात्र फरार झाला आहे. या प्रकरणी संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# परभणीतून जाणाऱ्या रेल्वेमार्गाची चाचणी पूर्ण

**परभणी । वृत्तसंस्था**

दक्षिण मध्ये रेल्वे विभागातील विद्युतीकरणाच्या कामाने गती घेतलेली आहे. यामध्ये जवळपास अनेक ठिकाणी कामे पूर्ण झाली आहेत. यात शनिवारी परभणी ते मिरखेल या १६ किलोमीटर मार्गावर आणि मानवत रोड ते उस्मानपुर या ३३ किलोमीटर अशा एकूण ४९ किलोमीटर मार्गाचे सीआरएस इलेक्ट्रिसिटी ट्रायल पूर्ण करण्यात आले. या चाचणीसाठी दक्षिण मध्य रेल्वेचे प्रिनिसिपल चीफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर पी.डी.मिश्रा यांची उपस्थिती होती. परभणी येथून परळी जाणाऱ्या रेल्वे मार्गावरील ६३ किलोमीटरचे विद्युतीकरण मागील वर्षी पूर्ण झाले आहे. या मार्गावर विद्युत प्रवाह सोडण्यात आला असून त्याची इलेक्ट्रिफिकेशन ट्रायल सुद्धा पूर्ण झाली आहे. याशिवाय परभणी-पूर्णा या मार्गावर मिरखेल रेल्वे स्थानकापर्यंत विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले असून १६ किलोमीटर मार्गाची ट्रायल चाचणी शनिवारी झाली. मानवत रोड ते उस्मानपुर या ३३ किलोमीटर मार्गावर चाचणी घेण्यात आली. आता केवळ परभणी ते मानवत रोड रेल्वे मार्गाचे काम काही प्रमाणात बाकी आहे. या शिवाय पूर्णा ते मिरखेल स्थानकादरम्यान १२ किलोमीटर अंतरावर फाउंडेशन वर्क सुरू आहे. शनिवारी रेल्वे इलेक्ट्रिकेशन (कोअर) सिकंदराबाद विभागाचे प्रिन्सिपल चिफ इलेक्ट्रिकल इंजिनिअर पी.डी.मिश्रा यांच्यासह पथक विद्युत चाचणीसाठी या मार्गावर आले होते. इलेक्ट्रिक जोडणीचे इंजिन लावून गती आणि अन्य तांत्रिक बाबी तपासून त्यांच्या उपस्थितीत हे ट्रायल घेण्यात आले. त्याचा अहवाल अद्याप समोर आला नसला तरी ही चाचणी घेण्यात आली. त्यामुळे आगामी काळामध्ये जलदगतीने काम पूर्ण करून उर्वरित ठिकाणची कामे केली जाणार आहेत. या वर्षात तरी किमान परभणी -परळी, परभणी-पूर्णा, परभणी-मानवत रोड एकत्रित सुरु झाल्यास पूर्णा येथूनच विद्यूतीकरणाच्या मार्गावर रेल्वे धावण्यास सुरवात होऊ शकते. दक्षिण मध्य रेल्वे मार्गावर परभणी जंक्शन येथून सध्या परळीकडे जाणारा मार्ग, सोबतच मिरखेलकडे जाणारा मार्ग आणि मानवत रोडकडे जाणारा मार्ग अशा तीनही मार्गावर विद्युतीकरणाचे काम सुरू आहे. दोन मार्गावरील काम पूर्ण झाले तर मानवत रोड मार्गावरील काम अजून पूर्ण होणे बाकी आहे. जेथे काम पूर्ण झाले आहे, अशा ठिकाणी २५ हजार व्होल्टचा विद्युत प्रवाह सोडण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांनी सुद्धा याबाबत काळजी घ्यावी, रेल्वे रुळ ओलांडताना सोबतच कोणत्याही विद्यूत खांबाला हात लावू नये, असे आवाहन दमरे विभाग तसेच परभणी आरपीएफच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामिण रुग्णालय रायमोहा बांधकामाची माजी मंत्री जयदत्तअण्णाकडून पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

माजीमंत्री माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी ग्रामिण रुग्णालय रायमोह ता .शिरुर (कासार) या इमारतच्या चालु आसलेल्या बांधकामास रविवार दि ७ रोजी भेट दिली देऊन गुत्तेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागास काम दर्जेदार आणि लवकर काम पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या आहेत. ग्रामिण रुग्णालय रायमोह इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिलेखावरील नोंदी नुसार सन १९७७-७८ च्या कालावधीत बांधलेले आसुन बांधकामास आज ४५ वर्ष पुर्ण होत आहेत.सदर इमारत तांत्रिक दृष्टया रुग्णालय वापरासाठी अयोग्य असल्या बाबत सा.बां बीड विभाग -२ यांनी जावक क्रमांक ७२४/ दिनांक २५/४/२०१७ अन्वये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना कळवले होते,इमारतीची जिर्णावस्था तालुक्यातील लोकांची मागणी तसेच वाढत्या लोकसंख्येनुसार नविन इमारतीची अवश्यकता या बाबींचा विचार लक्षात घेवुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या सुचनेवरुन सा.बां बीड विभाग -२ यांनी सदरील रुग्णालयाचा टाईप प्लान नुसार अंदाजपत्रक तयार करुन पुढील अवश्यक त्या कार्यवाही साठी कार्यकारी अभियंता , अधिक्षक अभियंता मुख्याभियंता,जिल्हा शल्य चिकित्सक पुढे मा .संचालक आरोग्यसेवा रुग्णालये (राज्यस्तर ) यांच्या कडुन मंजुरी मिळणे साठी पाठवला होता.माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ रोजी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस हे बीड येथे अमृत भुयारी गटार योजना व नगरोत्थान अंतर्गत सिमेंट रोड या कामाचे भूमिपूजन करण्यासाठी आले आसता ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाच्या व अंदाजपत्रक व आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळावी यासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली होती.त्या अनुषंगाने २९ ऑगस्ट २०१९ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांनी ग्रामीण रुग्णालय रायमोह च्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णयाद्वारे १३८० लक्ष रु. प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.३० खाटांच्या या ईमारतीसाठी प्रत्यक्षात बांधकाम करण्यासाठी ९ कोटी ६ लाख ३६ हजार २४३ रूपयांचा निधी मंजूर करून आणला होता.या कामात पार्किंग व्यवस्था, गार्डन आणि सोलार प्रणालीचे सुद्धा प्रयोजन आहे. त्यामुळे जयदत्तअण्णा सत्तेत असो किंवा नसो विकास हीच आमची जात आणि विकास हाच आमचा धर्म असे मानून चालणार्या माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांनी रायमोह येथे दिलेला शब्द पूर्ण केला असल्यामुळे रायमोह पंचक्रोशी ग्रामस्थांनी आणि शिरुर तालुक्यातील जनतेने माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे मनापासून आभार मानले आहेत.लवकरच या आरोग्य सुविधा रुग्णांना प्राप्त होणार आसुन यासाठी शिरुर तालुक्यातील सर्व जनतेकडुन समाधान व्यक्त करण्यात येत आहे.दि ७ रोजी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी रायमोहा येथील आपल्या संपर्क कार्यालयात भेट दिली असता आसपासच्या शेकडो ग्रामस्थांनी आपल्या समस्या मांडल्या आणि रुग्णालयाचे होत असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले.



## अखेर जरांगे पाटलांच्या गावात सापडल्या कुणबी नोंदी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या अनुषंगाने सर्वच स्तरांतून कुणबीच्या नोंदी शोधण्याची मोहीम सुरू आहे. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचीच नोंद सापडत नसल्यामुळे चर्चेला उधाण आले होते. अखेर रविवारी जरांगे यांच्या जन्मगावी कुणबीच्या नोंदी सापडल्या आहेत. त्यांची नोंद सापडल्यामुळे सकल मराठा समाजात आनंदाला उधाण आले आहे. शिरुर कासार येथे रविवारी भूमी अभिलेख कार्यालयात मोडी तज्ज्ञ संतोष यादव यांनी कुणबीच्या नोंदी शोधून काढल्या. यावेळी भूमी अभिलेख कार्यालयाचे अल्पेश पाटील, मराठा समन्वयक डॉ. उद्धव घोडके, मनोज जरांगे यांचे वडील रावसाहेब जरांगे आदी उपस्थित होते. १८८०च्या ब्रिटीश सरकार काळातील अतिजीर्ण झालेल्या दस्ताऐवज नोंदीत या कुणबी नोंदी सापडल्या आहेत. आतापर्यंत तालुक्यातील ५४ गावांमधील कुणबीची तपासणी करण्यात आली आहे. त्यात १५१ नोंदी आढळून आल्या आहेत. तालुक्यातील बावी, फडके, बोरगाव च. हाजीपूर, फुलसांगवी, तिंतरवणी, तरडगव्हण भोसले, घाटशिळपारगाव व जाटनांदूर या गावात कुणबी नोंदी मिळून आल्या, तर रविवारी मातोरी गावची दस्ताऐवज तपासणी केली असता ७१ नोंदी मिळून आल्या आहेत. ज्यात मनोज जरांगे यांचाही समावेश आहे. दरम्यान, शनिवार व रविवार सुट्टीचा दिवस फेर तपासणीसाठी देणार असल्याचे यादव यांनी सांगितले. आजपर्यंत मोडी तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे नोंदी शोधणे अवघड झाले होते. आता तज्ज्ञ उपलब्ध झाल्यामुळे नोंदी सापडत असून, कुणबी नोंदीत आणखी वाढ होणार असल्याचे सांगण्यात



▶▶ पान २ वर

## मराठा आरक्षण सर्वेक्षणासाठी जिल्ह्यात कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील सर्व जातींचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. येत्या आठवड्यात या सर्वेक्षणाला सुरुवात होणार आहे. जिल्ह्यात ३ हजार ४७९ प्रगणकांची यासाठी नियुक्ती केली गेली आहे. त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या आंदोलनामुळे सरकार एक एक प्रक्रिया पार पाडत आहे. मराठा समाजाला आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास सिद्ध करण्यासाठी मागासवर्ग आयोगाने मराठा समाजासह सर्व खुल्या जातींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. गोखले इन्स्टिट्यूटच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ॲपच्या द्वारे हे सर्वेक्षण होईल. यासाठीच्या प्रश्नावलीला मान्यताही दिली गेली आहे. जिल्हाधिकारी या मोहिमेच्या नोडल अधिकारी असतील तर उपजिल्हाधिकारी सहायक असतील. तालुक्याला तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्यावर ही जबाबदारी असेल. तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक यांच्यासह इतर सरकारी कर्मचारी हे प्रगणक म्हणून काम करणार आहेत. बीड जिल्ह्यात ३ हजार ४७९ कर्मचाऱ्यांची प्रगणक म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. त्यांना ॲप वापराचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. गाव सभा घेऊन जागृती सर्वेक्षणासाठीची प्रश्नावली व त्याची उत्तरे नागरिकांनी कशी द्यायची याबाबत गावसभा घेऊन जनजागृती करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या आहेत. बीड जिल्ह्यातही येत्या दोन, चार दिवसांत गावसभा घेतल्या जाणार आहेत.

## सटवाजी मेंडके यांचे निधन

**माजलगाव । प्रतिनिधी:**



शहरातील नविन बसस्थानक समोरील परिसरातील रहिवाशी कै. सटवाजी शामराव मेंडके वय ८५ वर्षे यांचे अल्पशा आजाराने आज दि. ६ जानेवारी २०२४ रोजी पहाटे निधन झाले. कै. सटवाजी मेंडके हे सामाजिक कार्यात अग्रेसर होते त्यामुळे सर्व परिचीत होते. कैकाडी समाजातील गोर - गरिब मुलींचे लग्न असो किंवा कुठलीही अडचण असल्यास नेहमीच सहकार्य करत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या निधनाने कैकाडी समाजातील कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पार्थीवावर बायपास रोडवरील कैकाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील डॉक्टर, वकील, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पाच मुले, चार मुली, सुना, नावतंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. येथील भाजपाचे जेष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके यांचे वडील होत.

## कांबळे यांना सहाय्यता निधीतून आर्थिक मदत

**माजलगाव । प्रतिनिधीं**

येथील भीम नगर येथील रहिवाशी पार्वती महादू कांबळे यांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन पन्नास हजार रूपयांची आर्थिक मदत मिळाली असुन यासाठी शिवसेनेचे शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी पाठपुरावा केल्याने कांबळे यांना ही मदत मिळाली आहे. येथील पार्वती कांबळे यांना कॅन्सर आजारासाठी मोठा खर्च लागणार होता. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने कांबळे कुटूंबीय सदरील खर्च करू शकत नव्हते. याची माहिती शिवसेनेचे शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांना मिळताच त्यांनी कॅन्सर आजारावर होणारा खर्चभागविण्यासाठी सर्व कागदपत्रे व पाठपुरावा करून त्यांना पन्नास हजार रूपयांची मदत मिळवुन दिली असुन कांबळे यांचेवर मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टियूटसंभाजीनगर येथे उपचार होणार आहेत. तरी पार्वती कांबळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ श्रीकांत शिंदे कक्ष अधिकारी मंगेश चिवटे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, नेते बाजीराव चव्हाण यांचे त्यांनी आभार व्यक्त केले आहे.

## मोटारसायकलला दिली धडक

**बीड । प्रतिनिधी**

कॉलेजहून गावाकडे निघालेल्या १७ वर्षीय मुलीची छेडछाड करत तिला धमक्या देऊन मोटारसायकलची धडक देत जखमी केल्याची घटना घडली असून या प्रकरणी घाटसावळी येथील एका तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टोकवाडी येथील १७ वर्षीय तरुणी ढेकणमोहा येथील महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. या मुलीस घाटसावळी येथील अक्षय जाधव नामक तरुण नेहमीच त्रास देत असत. ५ जानेवारी रोजी सदरील तरुणी

▶▶ पान २ वर

## मराठी वृत्तपत्राचे जनक दर्पणकार जांभेकर जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

राठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती आज जिल्हा माहिती कार्यालयात साजरी करण्यात आली. जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्यामुळे, आजचा दिवस महाराष्ट्रात 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

जिल्हा माहिती कार्यालयाच्या प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजु निमसरकर यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी कार्यालयातील कर्मचारी शिवाजी गमे तसेच श्री कांडेकर उपस्थित होते. यासह तेलगाव परीसरचे संपादक किशन माने, सांध्य दैनिक बीड नगरी चे संपादक प्रंचड सोळंके, मंगेश निटुरकर, लोकमंथनचे प्रतिनिधी देवेंद्रसिंह ढाका, अविनाश कुलकर्णी, दिव्य आधारचे संपादक शेख राजधानी यांनी जिल्हा माहिती कार्यालयात येऊन बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन येऊन अभिवादन केले.

## लेकीच्या जन्माचे मिरवणूक काढून स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

मुलगी जन्माला आल्यानंतर गावात वाजतगाजत मिरवणूक काढून स्त्री जन्माचे स्वागत गेवराई तालुक्यातील खामगाव येथे केले जात आहे. 'लाखात एक खामगावची लेक' हा उपक्रम येथील जि.प.शाळेच्या शिक्षिकेने गेल्या अनेक वर्षांपासून सुरू केला आहे. तेव्हापासून खामगाव येथे मुलगी जन्मली की तिच्या घरापासून शाळेपर्यंत वाजतगाजत मिरवणूक काढली जाते. मुलीच्या आईला साडी चोळी, वडिलांना शाल, श्रीफळ आणि मुलीला खेळणी व ड्रेस देऊन यथोचित सत्कार केला जातो. राष्ट्रीय महामार्गावर दोन हजार लोखसंख्येच्या गावातील बहुतांश ग्रामस्थांचा व्यवसाय हा शेती व ऊसतोडीचा आहे. गावात जिल्हा परिषदेची शाळा असून, पहिली ते चौथीपर्यंत वर्ग आहेत. या शाळेत ३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा नागरगोजे यांनी ज्ञानदानासोबतच लेकीच्या जन्मोत्सवाच्या क्रांतीचे नवे पाऊल टाकले आहे. गावातील महेश मचे यांच्या घरी मनस्वीचे आगमन झाले. सावित्रीबाई फुले व बालिका दिनानिमित्त

▶▶ पान २ वर

## गर्भलिंग निदानाची चौकशी करून मोक्का अंतर्गत कारवाई करा -डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गर्भलिंग निदान व गर्भपात तसेच गर्भ पिशव्या काढण्याचे प्रकार वाढलेले असुन या संदर्भात मोठे रॅकेट कार्यरत असुन तपासयंत्रणे बाबत जनसामान्यात संशय असुन बीड जिल्ह्यातील सर्व प्रकरणात एसआयटी मार्फत निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्यात येऊन दोषींवर संघटीत गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.८ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृहमंत्री, महिला व बालविकास मंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात आदि सहभागी होते. बीड जिल्ह्यात गर्भलिंग निदान व गर्भपात करणारे मोठे रॅकेट कार्यरत असुन राजकीय नेते तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमताने आरोपींवर थातुरमातुर कारवाई करण्यात येऊन मुख्य सुत्रधार यांच्या पर्यंत तपास यंत्रणा जाणिवपूर्वक पोहचत नसुन प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे बीड जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर कमी होत आहे गेल्यावर्षी बीड तालुक्यातील बकरवाडी येथील शितल गणेश गाडे हिचा नियमबाह्य गर्भपातामुळे मृत्यू झाला होता संबंधित प्रकरणात सध्या गेवराई येथील गर्भलिंग निदान व गर्भपात प्रकरणात छापा मारुन अटक करण्यात आलेली मनिषा सानप व फरार डॉ.सतिश गवारे यांना अटक करण्यात आली होती.परंतु संबंधित प्रकरणी पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अथवा जाणिवपूर्वक मुख्य सुत्रधारापर्यंत तपास यंत्रणा पोहोचली नाही.आरोपींना जामिन मिळण्यासाठी तत्कालीन पोलीस यंत्रणेतील तपास अधिकारी यांनी मदत केली त्यामुळे तपास यंत्रणेबाबत जनसामान्यात संशय आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वच प्रकरणांची एसआयटी मार्फत निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून चौकशी करून दोषींवर संघटीत गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी. बीड जिल्ह्यात मागील ५ वर्षात ४ हजार ७१४ महिलांच्या गर्भपिशव्या काढल्याची धक्कादायक माहिती असुन अडीच हजार पिशव्या खाजगी रूग्णालयात काढलेल्या आहेत.धक्कादायक म्हणजे २३ वय असलेल्या एका विवाहितेचीही शस्त्रक्रिया झाल्याची माहिती आहे.२०१६ ते २०१८ या ३ वर्षात १०१ खाजगी रुग्णालयात तब्बल ४ हजार ६०५ महिलांच्या गर्भपिशव्या काढल्या आहेत.२०२० व २०२१ मध्ये हा आकडा निम्म्यावर आला मात्र याकडे दुर्लक्ष झाल्याने २०२२ मध्ये हा आकडा पुन्हा वाढल्याचे दिसून आले.मागील ३ वर्षात ९९ महिलांना सरकारी डॉक्टरांनी गर्भपिशवी काढण्याच्या शस्त्रक्रियेची गरज नसल्याचे सांगत परवानगी नाकारली असतानाही गर्भपिशवी काढण्याचा सल्ला खाजगी डॉक्टरांनी दिल्याचे उघड झाले आहे.यामुळे संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## बीड जिल्ह्यात लवकरच रेल्वे धावणार -माजी आ.देशमुख

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड - परळी - नगर रेल्वेप्रश्नासाठी पत्रकार व मराठवाडा जनता विकास परिषदेने मोठा लढा दिला असुन या लढ्याला यश आले असुन बीडच्या रेल्वेचे स्वप्न लवकरच साकारणार असल्याचे माजी शिक्षक आमदार डि.के. देशमुख यांनी सांगीतले. माजलगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने दि.७ जानेवारी रोजी रविवारी दर्पण व विवीध पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलत होते. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी बोलतांना श्री. देशमुख म्हणाले की, नितीमुल्ये पाळल्यास प्रत्येक व्यक्ती ज्या त्या क्षेत्रात यशस्वी होतो. बीड नगर परळी रेल्वेचा प्रश्न लवकरच साकार होणार असुन रेल्वेत बसण्याचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे सांगीतले. यावेळी बोलतांना माजी आमदार मोहनराव सोळंके म्हणाले की, मतदारसंघामध्ये ग्रामीण भागात रस्त्याची



मोठी दुरावस्था झाली असुन विवीध समस्या मांडण्याचे काम येथील पत्रकार करतात. माजलगावचे पत्रकार सकारात्मक पत्रकारिता करतात तर माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील म्हणाले की, माजलगाव पत्रकार संघाचे कार्य उल्लेखनिय व कौतुकास्पद आहे. मागील चौदा वर्षांपासुन विवीध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देउन त्यांचा गौरव करतात. विवीध प्रश्न मार्गी लागावेत याकरीता राजकीय नेत्यांनी आंदोलने करणे गरजेचे आहे परंतु मागील अनेक वर्षांपासुन असे दिसत नाही तर येथील पत्रकारच विरोधी पक्षाची भुमिका बजावत असल्याचे बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी सांगीतले. आपल्या जडणघडणीमध्ये मोठा वाटा असुन मतदार संघातील समस्या सोडवण्यासाठी येथील पत्रकार कायम प्रयत्नशिल असल्याचे भाजपा नेते रमेश आडसकर यांनी सांगीतले. सोळंके कुटूंबीय पत्रकारांच्या कार्यामध्ये कायम सहभागी असल्याचे विरेंद्र सोळंके यांनी सांगीतले. अध्यक्षीय समारोपात उमेश मोगरेकर म्हणाले की, लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी पत्रकार जागल्याची भुमिका बजावतात तर समाजातील योग्य व्यक्तींना पुरस्कार देउन त्यांच्या कार्याची दखल पत्रकार संघ घेत असल्याचे सांगीतले. यावेळी अच्युत लाटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजलगाव पत्रकार संघाचा दर्पण पुरस्कार अमरनाथ खुर्पे यांना तर माजी शिक्षक आमदार डि. के. देशमुख यांना मराठवाडा भुषण पुरस्कार तर विनोद गोपाळ, गोविंद गरड यांना यशस्वी उद्योजक म्हणुन पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रास्ताविक तुकाराम येवले यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी तर आभार कमलेश जाब्रस यांनी मानले. यावेळी सत्काराला उत्तर देतांना अमरनाथ खुर्पे म्हणाले की, १९ वर्षे केलेल्या पत्रकारितेची दखल घेउन पत्रकार संघाने दिलेला दर्पण पुरस्कार हा निश्चीतच प्रेरणादायी राहिल. यावेळी बोलतांना यशस्वी उद्योजक एकनाथ गोपाळ म्हणाले की, माजलगाव सारख्या ग्रामीण भागातुन आज माजलगावकरांच्या प्रेमामुळेच यशस्वी होवु शकलो आज पत्रकार संघाने दिलेला पुरस्कार हा आपल्या मातीतुन दिलेला पुरस्कार असुन देश - विदेशात धपाटे पोहंचवण्यासाठी निश्चीतच उपयोगी ठरेल.